प्लॅनिंग फोरमतर्फे

# २२ खेडयांची
# आर्थिक–सामाजिक

# पा हा णी


प्रा. एस्. जी. तोंडारे

एम्. ए; एम्. कॉम्.

प्रा. आय्. ए. काळे

एम्. ए; बी. एड्.



महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय उदगीर

जिल्हा : उस्मानाबाद – महाराष्ट्र

प्रकाशक :
प्राचार्य डॉ. ना. य. डोळे
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर.

फेब्रुवारी, १९६८

मुद्रक :
शां. पं. सराफ,
आदर्श छापखाना,
सराफ बाजार : उदगीर

## अनुक्रमणिका


| प्रकरण | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ : | प्रास्ताविक | १ |
| २ : | ग्रामीण अर्थव्यवस्था | ३ |
| ३ : | शिक्षण | ५ |
| ४ : | अस्पृश्यता | ८ |
| ५ : | सहकारी चळवळ | ११ |
| ६ : | दळणवळण व वाहतूक | १४ |
| ७ : | आरोग्य-कुटुंबनियोजन-दारूबंदी | १६ |
| ८ : | सर्वोदय | २१ |
| ९ : | ग्रामपंचायती | २३ |
| १० : | संकरीत ज्वारी | २६ |
| ११ : | शेती | २८ |

# प्रास्ताविक

सर्वोदय मंडळ उदगीर आणि महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील 'प्लॅनिंग फोरम' तर्फे एक पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. ही पदयात्रा दिनांक ८ ऑक्टोबर १९६७ रोजी सुरु होऊन १५ ऑक्टोबर १९६७ ला संपली. या पदयात्रेत खालील खेड्यांना भेटी दिल्या

१) नेत्रगांव २) येणकी ३) देवणी ४) पंढरपूर ५) गुरधाळ ६) शंभुउंबरगा ७) सताळ ८) कवनसांगवी ९) डिगरस १०) हेर ११) कुमठा १२) तोंडार १३) वाढोणा १४) वेळमांगवी १५) लाळी (खुर्द) १६) येवरी १७) डांगेवाडी १८) गुडसूर १९) घोनसी २०) नळगीर २१) कोदळी २२) कासराळ

ही पदयात्रा सुमारे ७५ मैलांची होती. या पदयात्रेत सर्वोदय मंडळाच्यावतीने श्री. बापूअय्या साहेब वकील, श्री. माणिकलाल कोटेचा आणि संगय्या स्वामी हे तिघे आणि 'प्लॅनिंग फोरम' तर्फे आम्ही दोघे प्रा. एस्.जी. तोंडारे आणि प्रा. आय्. ए. काळे–होतो.

आमचा पदयात्रेचा उद्देश खेड्यांची आर्थिक, सामाजिक आणि राजकीय स्वरुपाची पाहाणी करणे हा होता. खेड्यातील लोकांच्या गांठी भेटीतूनच त्यांच्या अडीआडचणी सहज समजून येऊ शकतील व त्यांची खरी परिस्थिति लक्षात येऊ शकेल याच कल्पनेने आम्ही पदयात्रेत भाग घेतला. पदयात्रेत आलेला अनुभव पुढे आम्ही शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे

श्री. बापूय्या हळ्ळीकर यांच्यामुळे आमची राहाण्याची व

भोजनांची सहज व्यवस्था होऊ शकली. या बद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. तसेच नेत्रगांवचे दत्तात्रय पाटील व केशवराव नेत्रगांवकर, देवणीचे ग्रामसेवक, पंढरपूरचे माधवराव पाटील, गुरधाळचे सरपंच श्री. मोमले, शंभुउंबरग्याचे सरपंच श्री. भोसले आणि श्री. माणिकराव पाटील, डिगरसचे श्री. पर्वतराव पाटील, हेरचे श्री. गुरमे, तोंडारचे सरपंच श्री. दिगंबरराव पटवारी, बेळसांगवीचे बी. डी. ओ. श्री. मारुतीराव पाटील आणि श्री. दत्ता पाटील, लाळीचे श्री. शिवराम कारभारी, गुडसूरचे सरपंच श्री. मुडपे, घोनसीचे माजी आमदार श्री. माधवराव घोनसीकर नळगीरचा आमचा विद्यार्थी मुरहारी बी. ए. एफ. वाय. कोदळीचे श्री. वामनराव पाटील, कासराळचे श्री. किशनराव शेळके यांनी आम्हांस बहुमोल सहाय्य केले या बद्दल त्यांचे आभार मानणें आवश्यक आहे. या शिवाय प्रत्येक गावांतील कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी सर्वोतोपरी मदत केली या बद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

आमचे आवडते प्राचार्य डॉ. ना. य. डोळे यांच्या प्रेरणेमुळेच आम्ही पदयात्रेस निघालो. आम्ही पदयात्रेत असताना आमची वेळोवेळी त्यांनी सहानुभूतीपूर्वक फोन व इतर मार्गांनी विचारपूस केली. या शिवाय या उपक्रमासंबंधी आम्हास मार्गदर्शन ही केले. ही संधि त्यांच्यामुळेच आम्हास प्राप्त झाली आणि आम्हास अशा प्रकारचा बहुमोल अनुभव प्राप्त झाला. या बद्दल त्यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

प्रा. एम्. जी. तोंडारे
प्रा. आय्. ए. काळे

# ग्रामीण अर्थव्यवस्था

भारत हा खेडयांचा देश आहे. ८० टक्के लोक खेडयातूनच राहतात. शेती हा तेथील लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. शेती हीच खेडयातील लोकांची जीवन पद्धती आहे. खेडयांचा विकास म्हणजेच देशाचा विकास होय. भारतातील खेडयापाडयात अज्ञान, दारिद्रय–दैन्य यांची सीमा नाही.

आम्ही ज्या २२ खेडयांची पाहणी केली त्या खेडयांची अर्थ व्यवस्था ढासळलेली आहे. खेडयातील लोकांचे दरडोई रोजी उत्पन्न ५० पैसे आहे.त्यांचे राहणीमान खालच्या पातळीवर स्थिर झालेले आहे. त्यांचे उत्पन्न अगदी कमी असल्यामुळे ते पैशाची बचत करु शकत नाहीत. किंबहुना त्यांचे उत्पन्न एवढे कमी आहे की, त्यांच्या मूलभूत गरजाच पूर्ण होत नाहीत त्या अर्थी बचत करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यांची बचत कमी असल्यामुळे ते शेतीमध्ये पैसा गुंतवू शकत नाहीत. आणि यामुळे त्यांचे उत्पन्न कमी असते. अज्ञान आहे म्हणून दारिद्रय आहे आणि दारिद्रय आहे म्हणून अज्ञान, असे हे दुष्टचक्र आढळते.

शहरातून वावरत असताना आपला किती विकास झाला आहे असे वाटते पण खेडयातील जीवन पाहून आपण किती मागे आहोत याची कल्पना येते. शेती ही जुन्या पारंपरिक पद्धतीनेच केली जाते. यंत्र युगाचा त्यावर कसलाही परिणाम झालेला नाही शेतीची उपकरणे अवजारे जुनीच आहेत. नवीन बी बियाणांचा उपयोग केला जात नाही. रासायनिक खते वापरली जात नाहीत टोकन आणि जपानी पद्धतीचा उपयोग केला जात नाही. खेडया-

तील लोकांची श्रद्धा जुन्या परंपरागत चालीवरच आहे. नवीनाचा स्वीकार करणे हे त्यांना आवडत नाहीं. उलट नवीनाची ते हेटाळणी करतात.

खेड्यातील जमीनीच्या क्षेत्रफळाची मशागत करण्याकरिता जेवढ्यालोकांची आवश्यकता असते त्या पेक्षा ५० प्रतिशत अधिक लोक शेतीवर अवलंबून आहेत. खेड्यातील लोकांना बारा महिने काम नसते. हंगामाच्या वेळी भरपूर काम असते परंतु एरवीमात्र बराच वेळ रिकामा असतो. अर्थात्त ही छुपी बेकारी ( Disguised unemployment ) आहे. शेती व्यवासायास इतर संलग्न जोडधंदे असले तर ही छुपी बेकारी कमी होईल व उत्पन्न वाढेल. परंतु या दिशेने पाऊल टाकले गेलेले नाही.

खेड्यांच्या आर्थिक विकासाकरिता वाहतुकीची साधने उपलब्ध नाहीत. यामुळे शहराबरोबर खेड्यांचा विकास होत नाही.

ग्रामपंचायतीचे उत्पन्न बेताचेच असते. उत्पन्नाच्या अभावामुळे ग्रामपंचायती विकासाच्या क्षेत्रात कार्यक्षम होऊ शकत नाहीत. खेड्यात पोष्ट ऑफिस, बँका, भोजनगृहे, निवासस्थाने इत्यादींचा आभाव आहे.

---

तक्ता नंबर १, ३, ४, पहा

# शिक्षण

ग्रामीण आर्थिक, सामाजिक व राजकीय क्रांति शिक्षणावरच अवलंबून आहे. ग्रामीण लोकांची मने बदलने आवश्यक आहे. पंच वार्षिक योजनेचा भाग म्हणून सामूहिक विकास योजना (Community Development Scheme) सुरु करण्यांत आली. या चळवळीचा मुख्य उद्देश खेडूतांची मने बदलणे हाच होता. शहरातील अद्ययावत माहीती खेडूतांना पुरवणारा ग्रामसेवक हा दूत समजला जातो. परंतु खेड्यांची पाहणी केल्यानंतर असे अढळून आले कीं, सामूहिक विकास योजना अयशस्वी ठरलेली आहे. खेड्यातील जनता अज्ञानी, दरिद्री व अशिक्षित असल्यामुळे हा बदल होऊ शकला नाही. खेड्यांचा विकास शिक्षणा शिवाय होऊ शकत नाही.

आम्ही पाहाणी केलेल्या सर्व खेड्यात शाळा उघडलेल्या आहेत. शाळा बहुतेक चावडी, देऊळ आणि ग्रामपंचायत ऑफिस मध्ये चालतात. फारच थोड्या गावांतील शाळांना स्वतंत्र इमारती आहेत. देवणी, हेर, तोंडार, वाढोणा आणि नळगीर येथे हायस्कूले आहेत. आनंदाची गोष्ट म्हणजे शाळांची आणि विद्यार्थ्यांची संख्या वाढत चालली आहे. त्यांत विशेष म्हणजे मागसलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या वाढत चालली आहे. बरेच हरिजन विद्यार्थी कॉलेज मध्ये प्रवेश घेतलेले आहेत ही समाधानाची गोष्ट आहे. कांही हरिजन विद्यार्थी पदवीधर झालेले आहेत व कांही होत आहेत असे आढळलें.

कबनसांगवी वाढोणा व घोणसी येथील विद्यार्थी परदेशला पुढच्या शिक्षणासाठी गेलेलें आहेत. घोणसी येथून प्रा. चंद्रपाल माधवराव घोनसीकर अमेरिकेला. वाढोणा येथून श्री. जनार्दन गोविंदराव गुट्टे अमेरिकेला आणि कबनसांगवी येथून श्रीधर रामराव सांगवीकर इंग्लंड गेलेले आहेत.

देवणी, तोंडार, वाढोणा आणि नळगीर येथून शिक्षक, डॉक्टर, वकील व इंजिनियर बरेच झालेले आहेत. तक्त्याच्या तपशीलावरुन असे दिसते कीं, तोंडार, वाढोणा नळगीर व देवणी ही गांवे मोडून इतरत्र सर्व गावात शाळेकरिता स्वतंत्र अशी इमारत नाही. डांगेवाडी येथे तर शाळा छपरातच चालते. या शाळेची स्थिती जनावराच्या गोठ्यापेक्षा ही वाईट आहे. दुःखाची गोष्ट अशी की डांगेवाडीच्या लोकांनी शाळेच्या इमारतीसाठी त्यांनी आपला वाटा नियमाप्रमाणे भरलेला आहे असे समजते. त्यांना कांही पुढाऱ्यांनी शाळा बांधून देण्याचे आश्वासनहि दिले असे समजते पण अद्यापी तेथील शाळा बांधण्याकरिता सरकारी रक्कम पंचायत समितीकडून मंजूर झालेली नाही. हीच परि-स्थिति जवळ जवळ इतर खेड्यात आढळून येते. म्हणूनच कित्येक गावात शाळा चावडीत, देवळात, झाडाखाली चालविल्या जातात.

आमच्या पाहाणीत असे आले कीं कित्येक गांवी शिक्षक नियमितपणे हजर नसतो. एकागांवी तर दोन महिने शिक्षक ह-जर नव्हता असे आढळले. अधिकाऱ्याच्या लक्षात ही गोष्ट येत नाही.

शिक्षक अनुपस्थित असल्याचे सरकारच्या निदर्शनास न येण्याचे कारण म्हणजे शिक्षक हा सरपंचाचा आश्रित असतो. सरपंच शिक्षकाकडून आपली खाजगी वैयक्तिक कामे करून घेतो. शिक्षकाला सरपंचाच्या विरूद्ध जाता येत नाही अशी परिस्थिति असते. गावातील जनता अज्ञानी व दरिद्री असल्यामुळे सरपंचाच्या वर्चस्वाखालीच असतात. अशा प्रकारची पिळवणूक थांबवल्या-शिवाय हे दोष दूर होणार नाहीत असे दिसते. हरिजन शिक्षक असले तर त्याला गावात राहाणेच कठीण होते. कारण सवर्ण समजल्या जाणाऱ्या वर्गाकडून ह्या शिक्षकाला धमक्या दिल्या जातात व वेळ पडल्यास त्याला मारहाण हि केली जाते.

बाढोणा येथे मुलींचे स्वतंत्र हायस्कूल आहे. तेथील हायस्कूल मध्ये मुलींची संख्या वाढत चालली आहे. आजच्या कालमानानुसार मुलीने शिक्षण घ्यावे असे तेथील पालकांची इच्छा दिसून आली. परंतु इतर ठिकाणी मुलीची संख्या शाळेत आढळून येत नाही. या वर्षि मॅट्रिक परीक्षेस बसणाऱ्या मुलींची संख्या १५ आहे. एकंदर २५० मुलींची संख्या आहे.

शाळांच्या स्वतंत्र इमारती होणे, चांगल्या विसीत शिक्षकांचा पुरवठा होणे, मुलांच्यासाठी खेळांची सोय होणे, शेजारच्या खेड्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहाची व भोजनाची सोय होणे अत्यंत आवश्यक आहे.

---

तक्ता नंबर २, पहा

## अस्पृश्यता

अस्पृश्यता हा हिंदु समाजावरील कलंक आहे. हा कलंक दूर करण्यासाठी महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर, म. फुले, सावरकर व अनेक सामाजिक पुढाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी पुष्कळ प्रयत्न केले. महात्मा गांधीनी महार मांग इत्यादींना हरिजन म्हणून संबोधिले. परंतु अजून विषमता कायम आहे. अस्पृश्यता नष्ट झाली नाही.

शहरात वावरत असताना स्पृश्य व अस्पृश्य या मध्ये तेवढा भेद आढळत नाही जेवढा खेडेगांवात आढळून येतो.

आम्ही पाहिलेल्या बहुसंख्य खेड्यामध्ये हरिजनासाठी वेगळ्या पाण्याच्या विहिरी आहेत. सवर्णांकरिता वेगळ्या विहिरी आहेत. कांहीं ठिकाणी हरिजन स्वतःहून सवर्णांच्या विहिरीवर पाणी भरत नाहीत तर कांहीं ठिकाणी अस्पृश्यांची इच्छा असूनहि सवर्ण आपल्या विहिरीवर पाणी भरु देत नाहीत. ज्या ठिकाणी सरकारने हरिजनाकरिता विहिरी खोदल्या नाहीत. विहिर खणली असून पाणी लागले नाही किंवा गोड पाणी लागले नाही, अशा ठिकाणी अस्पृश्यांना फार त्रास होतो. अशा गांवी सवर्णांच्या पाणी पिण्याच्या विहिरी असून देखील अस्पृश्यांना दोन तीन मैलावरुन दुसरीकडूनच पाणी आणावे लागते.

प्रत्येक गावात हरिजनवस्ती वेगळी व अलग आहे. खेड्यांमध्ये या वस्तीस महारवाडा व मांगवाडा म्हणून संबोधले जाते. हे लोक बहुसंख्येनें आहेत. शेती किंवा इतर संपत्तीचे साधन त्यांच्याजवळ नाही. जीवन आर्थिक दृष्ट्या परावलंबीच आहे. त्यांची उपजीविका तेथील सधन व सवर्ण लोकांवरच अवलंबून

आहे. म्हणूनच ते सधन व सवर्ण लोकांच्या विरूद्ध ब्रसुद्धा काढू शकत नाहीत. सधन व सवर्ण हरिजनांची पिळवणूक करतात. हरीजन मजूर व सवर्ण मजूर यांच्यात भेद केला जातो. सवर्ण मजूराला हरिजन मजूरापेक्षा जास्त मजूरी दिली जाते. याला मुख्य कारण असे सांगितले जाते कीं हरिजन मजूर सवर्णांच्या घरी पाणी भरु शकत नाही व सवर्ण मजूराच्या भाकरी शेतात नेऊ शकत नाही यामुळे मजूरी कमी दिली जाते.

हरिजन झोपडपट्टी मध्ये व गलिच्छ वस्तीमध्ये राहातात. त्यांचे राहाणीमान अत्यंत निकृष्ट दर्जाचे असते. खेड्यातील त्यांच्या अशा बहुरूपी जीवघेण्या समस्यामुळे अस्पृश्य खेडे सोडून शहराकडे धाव घेत आहे. आमच्या पाहणीत असे दिसले कीं बरेच लोक मुंबई येथे गेले आहेत.

समाधानाची गोष्ट अशी कीं, हेर येथे स्पृश्य व अस्पृश्य हे एकमेकांच्या विहिरीवर पाणी भरतात. हरिजनामध्ये शिक्षण घेण्याची प्रवृत्ती वाढलेली आहे. सुदैवाने उदगीर कॉलेज असल्यामुळे हरिजन विद्यार्थी पदवी परीक्षेपर्यंत शिक्षण घेऊ लागला आहे.

| इ. स. | P. U. C. (Arts, Commerce, Science) | B. A; B Com; B. Sc. | Total |
|---|---|---|---|
| १९६२–६३ | ... 7 | ... – | 7 |
| १९६३–६४ | ... 10 | ... 7 | 17 |
| १९६४–६५ | ... 18 | ... 8 | 26 |
| १९६५–६६ | ... 36 | ... 20 | 56 |
| १९६६–६७ | ... 59 | ... 26 | 85 |
| १९६७–६८ | ... 66 | ... 46 | 112 |
| Total | 196 | 107 | 303 |

Five students passed B. A; B. Com; B.Sc.

हरिजनाचे दारिद्र्य, अज्ञान व सामाजिक विषमता नष्ट करण्याकरिता विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. अजूनहि खेड्यातील समाज एक जिनसी झालेला नाही.

---

तक्ता नंबर ७, पहा

# सहकारी चळवळ

सहकारी चळवळ ही सावकारशाही नष्ट करण्यासाठी अस्तित्वात आली. सहकारी चळवळ ही भांडवलाची संघटना न-सून ती मानवाची संघटना आहे. सर्वांच्या सर्व सामान्य समस्या सोडविण्यासाठी सहकाराची अत्यंत आवश्यकता असते. आर्थिक दृष्टया दुर्बल असलेला गट सहकारी चळवळीतून संघटीत होवून आर्थिक दृष्टया बलशाली असलेल्या गटाशी लढा देतो. परंतु प्रत्यक्ष पाहाणीत असे आढळून आले कीं, ह्या चळवळीच्या फायदा आर्थिक दृष्टया सधन असलेंल्या गटालाच मिळालेला आहे.

प्रत्येक गावात सेवा सहकारी सोसायटी स्थापन झालेली आहे. परंतु असे आढळून आले कीं अशा सोसायटीचा अध्यक्ष हा बहुतेक जुन्या परंपरेतील सावकार किंवा सरंजामी अधिकार भोगलेली व्यक्तीच, पाटील, सरपंच, व सेवा सहकारी सोसाय-टीचा अध्यक्ष आहे. अशीव्यक्ती म्हणजेच त्या खेडयातील ब्रह्मा, विष्णू, व महेश, होतो व तो आपल्या स्वतःच्या लहरीप्रमाणे इत-रांची पिळवणूक करतो.

भू विकास बँके तर्फे शेतकऱ्याला कर्ज विहिरीकरिता दिले जाते. पण हे कर्ज विहीर खोदण्याकरिता अपूरे पडते. कर्ज देताना शेतकऱ्याच्या जमिनीच्या प्रतीचा — भूगर्भाचा — विचारच केला जात नाही कांहीं ठिकाणी तर असे आढळून आले कीं, कर्जातून शेतकऱ्यानी विहीर खोदण्याचा प्रयत्न केला परंतु त्याला दुर्दैवाने वरच पाषाण लागला व तो त्या पैशात विहीर काढू

शकला नाही. अर्थातच विहीर उत्पन्न वाढण्याचे साधन होऊ शकली नाही. तो एक नाममात्र खड्डा खोदू शकला कर्जाचा त्याला उत्पन्न वाढविण्यासाठी मुळीच फायदा झाला नाही. उलट कर्ज बोजा वाढला. त्याची आर्थिक परिस्थिति या कर्जामुळे ढासळली. म्हणून असे म्हणावे वाटते कीं कर्ज देते वेळे भूगर्भाची पाहणी करुन विहीर खोदण्यास लागेल एवढे कर्ज मंजूर करावे. भूविकास बँकेने आपले स्वतःचे बोअरिंग मशीन घेऊन शेतकऱ्यांना पाणी लागेल कीं नाहीं त्याचा अंदाजा अल्प दरात मिळवून द्यावा.

कर्ज एका विशिष्ट हेतूने दिलें जाते आणि त्या हेतुकरिता त्या कर्जाचा वापर झाला नाही तर त्या शेतकऱ्यांवर पैशाच्या गैर वापर झाल्याचा ठपका ठेवला जातो. परंतु असे सुचवावेसे वाटते कीं, कर्ज हे शेतकऱ्याच्या सर्वांगीण उन्नति करिता द्यावे. अशा शेतकऱ्याची स्थिति आर्थिक दृष्टया स्वावलंबी होईल इतपत कर्ज द्यावे. कर्ज देण्यापूर्वी शेतकऱ्यावर जो कांही कर्जाचा जुना बोजा आहे तो पहिल्यांदा माफ करण्यात यावा नंतर नवे कर्ज द्यावे. कर्जाला कर्जाच्या दृष्टीकोनातून पाहू नये तर शेतकऱ्याच्या उन्नतीच्या दृष्टीकोनातून पाहावे. शेतकरी हाच भारताचा कणा आहे.

शेतकऱ्याना पाहिजे तेंव्हा व आवश्यक तेवढे कर्ज मिळत नाही. शेती हा व्यवसाय समजून त्याला किफायतशीर धंदा म्हणून आवश्यक तेवढें भांडवल मिळाले पाहिजे. कर्ज वर्षातून एकदाच सहकारी सोसायटी तर्फे मिळते. ह्या सोसायटी तर्फे खत, बी बियाणे, आधुनिक अवजारे इत्यादि दिली जात नाहीत. सहकारी

सोसायटीचे स्वतंत्र असे कार्यालय नसते. सोसायटीच्या अध्यक्षाच्या घरीच किंवा त्याच्या खिशातच कार्यालय असते. सोसायटीचे स्वतंत्र ऑफिस नसल्यामुळे सभासदाना त्रास होतो.

आम्ही पाहणी केलेल्या खेड्यापैकी एका खेड्यात असे आढळून आले कीं सहकारी संस्थेच्या नोंदणीकरिता त्या भागातील पुढऱ्याजवळ भाग भांडवलाचे पैसे जमा केलें आहेत. पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, चार वर्षे होऊन देखील सहकारी संस्थेची नोंदणी झाली नाही

सहकारी चळवळ ही जनतेची चळवळ व्हायला पाहिजे होती परंतु ही चळवळ सरकारी चळवळ राहिलेली आहे. भारतात ही चळवळ अयशस्वी झालेली दिसते.

---

तक्ता नंबर ९ पहा

## दळणवळण व वाहतूक

खेड्याचा विकास होण्याकरिता सडकांची व वाहतुकीच्या साधनांची अत्यंत आवश्यकता असते. खेडी हा भारताचा प्राण आत्मा व हृदय आहे आणि शहर मेंदूप्रमाणे आहे. दळणवळण व वाहतुकीची साधने म्हणजे रक्त वाहिन्या, परंतु या रक्त वाहिन्यांच्या अभावी मेंदू वप्राण एकजीव नाहीत. यामुळे खेड्यांचा व शहरांचा समतोल विकास होत नाही.

देवणी आणि वाढोणा ही गांवे सडकेने उदगीरशी जोडली गेली आहेत. या दोन्ही खेड्यांचा विकास यामुळे होत आहे तसेच तोंडार व हेर ही खेडी उदगीरशी लोह मार्गांनी जोडलेली आहेत. आमच्या पाहणीतील इतर सर्व खेड्यांची उन्नति सडका व लोह- मार्गा अभावी होऊ शकली नाही. बैलगाडी, उंट, बैल, घोडे, गाढव इत्यादि जुनीच वहातुकीची साधने या विज्ञान युगात आढळतात पावसाळ्यात अक्षरशः काही खेड्यांचा उदगीरशी सुद्धा संपर्क राहात नाही-

दळणवळण व वाहतुकीच्या अभावामुळे शेतकऱ्याला शेती- चा माल विक्री करण्यास अडचणी येतात व शहरातून जीवनो- पयोगी वस्तु खेड्यात घेऊन जाणे कठीण होऊन बसते.

तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे पोष्ट ऑफिसेस बऱ्याच खेड्यात नाहीत. पोष्ट ऑफिस २२ खेड्यापैकी फक्त ७ गावात आहे यामुळे पत्रें, वर्तमानपत्रें इत्यादि खेड्यापर्यंत सहज व लवकर

पोंचत नाहीत. उदगीरहून लंडनला पत्र लवकर पोंचेल पण उदगीरपासून दहामैलावर असलेल्या खेड्याला त्या वेळात पोंचणार नाही.

टेलिफोनची व्यवस्था फक्त देवणीला आहे. तोंडारला लवकरच होणार आहे असे समजलें.

दळणवळण व वाहतुकीच्या साधना अभावी शहरातील नागरी संस्कृति खेड्यापर्यन्त पोंचत नाही.

---

> तक्ता नंबर ३,४ पहा

# आरोग्य-कुटुंबनियोजन–दारुबंदी

कल्याणकारी राज्यात व्यक्तीच्या आरोग्याकडे लक्ष देणे हे सरकारचे आद्य कर्तव्य आहे. विकास होत असलेल्या देशात औषधोपचार, स्वच्छता, साफसफाई इत्यादि बाबींच्या सुविधा सरकारने दिल्या पाहिजेत.

आम्ही पाहिलेल्या बहुतेक सर्व खेड्यात सरकारी मोफत दवाखान्याची सोय नाही. सोबतच्या तक्त्यात दाखविल्याप्रमाणे देवणी, व वाढोणा या ठिकाणी सरकारी दवाखान्याची सोय करण्यात आली आहे. घोनसी गांवी महारोग्यांसाठी दवाखाना आहे. गुडसूर, नेत्रगांव, कासराळ, तोंडार या गांवी जनावरांसाठी दवाखाने आहेत. आरोग्याच्या दृष्टीने दवाखान्याची संख्या अत्यंत अपूरी आहे. या सर्व दवाखान्यात प्राथमिक उपचार केले जातात. पदवीधर ( M. B. B. S. ) व अनुभवी डॉक्टरांचा अभाव आहे. कित्येक खेडेगावांत रोगाचे निदान बरोबर होत नाही आणि उपचारातील चूकामुळे रोगी दगावतात. अशा प्रकारे मृत्यू येणे हे आपले दुर्दैव समजावे. खेड्यापाड्यात प्रसूतीगृहे नाहीत. अपघात झाल्यास तावडतोब उपचार करण्याची सोय नाही.

खेड्यातील लोक दारिद्रय व अज्ञान यामुळे सकस व चौरस अहाराकडे लक्ष देत नाहीत. खेड्यात दुधाचा वापर चहाकडेच वाढत चाललेला आहे. उदगीरच्या जवळ खेडी उदगीरलाच दुध पुरवठा करतात. त्यापैकी बराचसा भाग हॉटेलांत चहासाठी वापरला जातो. क्रीमरी योजनेमुळे सुद्धा दुधातील कस म्हणजे

साय (Cream) शहरातील लोकांना मिळते व निकस दुध खेड्यातील लोकाना मिळते.

खेड्यातील घरांची रचना प्रकाश, हवा या दृष्टीकोनातून केलेली नसते. एकाच वाड्यात माणसे व जनावरे राहतात. गावात साफ सफाई व गटारांची व्यवस्था नसते. खेडेगावात संडासाची व्यवस्था नसते. गावाजवळील पाणद हे शौचविधीचें ठिकाण होय. त्यामुळे गावात प्रवेश करतेवेळी व बाहेर जातेवेळी दुर्गंधी तून जावे लागते. खेड्यातील लोकांची आयुमर्यादाची पाहाणी केली. या पाहाणीत असे आढळून आले कीं, फारच कमी लोकाना शंभरी गाठलेला आहे. एक वैशिष्ट्य असें कीं, ज्यांचे वय शंभरापेक्षा जास्त आहे असे बहुतेक हरिजन आहेत. बळसांगवी येथील श्रीमती यशोदा जयराम महारीन हिचे वय १२५ पेक्षा जास्त आहे असे सांगण्यात आले. हरिजन लोकांचे राहाणिमान खालच्या दर्जाचे असूनहि त्यांची वयोमर्यादा जास्त दिसून आली हे आश्चर्यकारक आहे ही बाब संशोधन करण्यासारखी आहे.

प्रत्येक खेड्यात अनुभवी व पदवीधर डॉक्टरांची नेमणूक करावी. औषधोपचाराकरिता मोफत दवाखाने उघडण्यात यावे. स्वच्छता, साफसफाई इत्यादीची व्यवस्था करणे आवश्यक आहे. तरुण डॉक्टरांना निदान दोन वर्षे तरी ग्रामीण भागांत दवाखाना उघडण्याची प्रेरणा द्यावी.

सध्याच्या वाढत्या लोकसंख्येला आळा घालणे अत्यंत आव आवश्यक आहे. या शिवाय भारतातील आर्थिक नियोजन यशस्वी होऊ शकत नाही. झालेला विकास वाढती लोक संख्या गिळंकृत

करते म्हणून लोकसंख्येला आळा घालण्याकरिता कुटुंबनियोजन सर्वोत्कृष्ठ मार्ग आहे. खेडेगावात कुटूंबनियोजनाला महत्व दिले जात नाही. उलट मुले ही देवाची देणगी आहे असे समजले जाते आणि त्यांच्या उपजीविकेचे प्रश्नहि देवच पाहून घेतो अशी खेडूतांची कल्पना आहे. लोकसंख्या वाढीमुळे निर्माण झालेल्या दारिद्र्याचाहि त्यांना राग येत नाही. कुटूंब नियोजनासाठी केलेली शस्त्रक्रिया, लूप इत्यादि संबंधी खेडूतामध्ये अनेक गैरसमज पसरलेले आहेत. शस्त्रक्रियेमुळे आरोग्य बिघडते अशी कल्पना आहे. लूपमुळे कॅन्सररोग होतो असे त्यांना वाटते. शस्त्रक्रिया व लूप यामुळे अनैतिक संबंध वाढतील अशी त्यांना भीती वाढते. काही अशी हे बरोबरहि वाटते. खेड्यात लूपची ' कुरूप ' म्हणून हेटाळणी केली जाते. कांही सनातनी हिंदूनी असा विचार प्रगट केला कीं, मुसलमान व ख्रिश्चन हे बहुतेक कुटूंब नियोजनाचा विचार करत नाहीत. आणि हिंदुनी कुटूंब नियोजन केले तर कांही दिवसानी हिंदुची संख्या घटेल व मुसलमान आणि ख्रिश्चनांची संख्या वाढेल अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

खेड्यात कुटूंबनियोजनाचा गंभीरपणे विचार केला जात नाहीं. देशाच्या आर्थिक विकासाची खेडूताना मुळीच कल्पना नाही. या दृष्टीने लोकांच्या दृष्टोकोनात परिवर्तन घडवून आणणे अत्यंत आवश्यक आहे. या संबंधात प्रचार आणि शास्त्रोक्त माहिती पुरविणे आवश्यक आहे. कोणतेहि व्यसन हे वाईटच असते. त्यातल्यात्यात दारुचे व्यसन एकदा लागले म्हणजे त्यापासून सुटका होणे कठीण असते असे म्हटले जाते.

सध्या दारु खुली व्हावी असा विचार चालू आहे. दारुबंदी संबंधी खेडूताना कांही प्रश्न विचारले. खेडूतानीं दारु खुली व्हावी अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. या मागचा उद्देश असा आहे कीं, दारुबंदीमुळे पोलिसखात्यात लाचलुचपत वाढलेली आढळते. दारु-चे गुत्तेदार पोलिसाना हप्ते भरतात. यामुळे पोलिसाचे व गुत्ते-दारांचे श्रम न करता उत्पन्न वाढते. दारु खुली केल्यामुळे सरका-रचे उपत्न्न वाढेल आणि मध्यस्थांनाचे उत्पन्न नष्ठ होईल. दारु-बंदीमुळे दारुपिणे कमी झालेले नाही.उलट शहरामध्ये दारु पिणा-ऱ्यांची संख्या दारुबंदी झाल्यापासून वाढत चालली आहे. दारु-पिणाऱ्यांचा नवा वर्ग निर्माण झाला आहे आणि तो हि शहरातील. यात शहरातील मोठे आधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, पुढारी इत्यादींचा समावेश आहे. दारुपिणे हे आता प्रतिष्ठेचे लक्षण सम-जले जाते. दारुबंदी अमलात आणणारे आधिकारी आणि दारुबंदी व्हावी म्हणून ओरडणारे पुढारीच बऱ्हंशी दारु पितात.पोलिसाना व गुत्तेदाराना या लोकांचाच आश्रय व आशीर्वाद असतो. मग ही चळवळ यशस्वी कशी होईल?

निझामाच्या राजवटीत दारु खुली होती तेंव्हा खेड्यात बहुसंख्य लोक दारु पीत नसत, आणि आजहि दारु पीत नाहीत. याला महत्त्वाचे कारण असे कीं, खेडूताचे जीवन धर्म कल्पनेने भरलेलें असतें दारुपिणे हे धर्मबाह्य कृत्य समजले जाते. आर्य समाजाच्या, वीरशैव समाजाच्या व वारकरी संप्रदायाच्या प्रभा-वामुळे दारुपान होत नाही असे आढळून आलें. यात दारुबंदी कायद्याच्या यशाचा वाटा नाही. उदगीर लगतच्या खेड्यावर मात्र

शहारातील वातावरणाचा प्रभाव आहे. दूरची खेडी या पासून अलिप्त आहेत.

या सर्व समस्यांचा विचार केल्यानंतर असे वाटते की, सद्य परिस्थितीत दारु खुली करण्यात यावी. यामुळे राज्य सरकारचे उत्पन्न वाढेल व हाच व्यवहारी मार्ग आहे. कायद्याने दारुबंदी यशस्वी होणार नाही. लोकांच्या दृष्टीकोनात बदल होणे आवश्यक आहे आणि त्या दृष्टीनेच प्रयत्न केला पाहिजे.

---

तक्ता नंबर ३ पहा

## सर्वोदय

सर्वोदय म्हणजे सर्वांचा उदय. हृदयपरिवर्तन हा सर्वोदयाचा आत्मा. सर्वोदयात अपरिग्रहाला महत्व असते. मानवाच्या इच्छा अमर्यादित असतात परंतु सर्वोदय तत्त्वप्रणाली प्रमाणे इच्छा मर्यादित करणे आवश्यक आहे. जीवनोपयोगी वस्तूंची संख्या वाढवता उपयोगी नाही. इतरांचा हक्क मारुन वस्तूंचा अधिक उपभोग घेणे बरोबर होणार नाही. साधी राहाणी व उच्च विचारसरणी सर्वोदयाचा प्राण आहे. खरे म्हणजे हे तत्वज्ञान करुणा व समता यावर आधारलेले आहे.

या मूलभूत कल्पनेतूनच भूदान, ग्रामदान,संपत्तीदान, श्रमदान, जीवनदान इत्यादींचा जन्म झाला. उदगीर येथील सर्वोदय कार्यकर्ते आणि आम्ही खेड्यात जाऊन सर्वोदयाची व भूदानाची कल्पना दिली. जाहीर सभांतून, चर्चेतून व व्यक्तीगत गाठी भेटीतून आमचे विचार मांडले, नळगीर सोडून बाकी सर्व खेड्यातून सर्वोदयाचे विचार शांतपणे ऐकून घेतले चर्चा केली व आम्हाला सर्वोतोपरी सहाय्य केले.परंतु नळगीर येथे मात्र प्रतिसाद मिळाला नाही. आमची व्यवस्था आमचे कॉलेजचे विद्यार्थी होते म्हणून होऊ शकली.

खेड्यात अजून भूदान देण्याची मानसिक तयारी झालेली नाही. सर्वोदयाची कल्पना लोकांना समजलेली नाही.

ही चळवळ यशस्वी होण्याकरिता शहरातील लोकातहि दान देण्याची प्रवृत्ती वाढली पाहिजे. संपत्तीदान, घरेदान, खोल्या दान इत्यादि दानांचा फैलाव झाला पाहिजे.बेघर लोकाना आश्रि-

क घरे असणाऱ्यानी घरे द्यावीत किंवा खोल्या द्याव्यात. अतिरिक्त वस्तूंचा उपभोग इतराना घेऊ द्यावा.

या चळवळीला कांही मर्यादा आहेतच. या चळवळीला अतिरेकी स्वरुप देऊ नये. ही चळवळ म्हणावी तशी यशस्वी झालेली नाही.

# ग्रामपंचायती

१ मे १९६२ पासून महाराष्ट्रात पंचायत राज्याची सुरुवात झाली. पंचायत राज्यामुळे आर्थिक आणि राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण होते. सत्तेची केंद्रे दिल्लीत किंवा मुंबईत न राहाता भारताचे अत्यंत महत्त्वाचे घटक असलेले हेच सत्तेचे केंद्र बनले पाहिजे. असे न झाले तर लोकशाही टिक-णार नाही. पंचायत राज्यामुळे लोकशाहीचा पाया मजबूत होतो. भारत देश हा खेड्यांचा देश आहे. लोकशाहीची पाळेमुळे मजबूत होण्यासाठी ग्रामपंचायत बलशाली होणे अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्रातील पंचायत राज्य हे बलवंतराय मेहता समितीने सुच-वलेल्या पंचायत राज्यापेक्षा वेगळे आहे. बलवंतराय मेहता समि-तीने सुचवलेल्या पंचायत राज्यामध्ये पंचायत समिती हीच प्रमुख व बलशाली आहे.परंतु आपल्या राज्यात जिल्हा परिषदेला जास्त महत्त्व देण्यात आले आहे. दोन्ही प्रकारात ग्रामपंचायतीला कनि-ष्ठ स्थान प्राप्त होते. पंचायत राज्यात ग्रामपंचायतच शक्तिशाली बनली पाहिजे असे आम्हास वाटते

प्रत्यक्ष पाहाणीत मात्र असे आढळून आले कीं, ग्रामपंचा-यतीची आर्थिक स्थिति फारच बिकट आहे. ग्रामपंचायतीला उत्प-न्नांची साधने नाहीत. ग्रामपंचायतीला घटनात्मक व कायदेशीर कर लादण्याचा अधिकार नाही घटनेत केंद्र सरकारच्या कामांची यादी,राज्य सरकारांच्या कामांची यादी सामायिक कामाची यादी आहेत. या तिन्ही याद्यात ग्रामपंचायतीला मूलभूत अधिकार नाहीत. ग्रामपंचायतीला जे कांही अधिकार मिळाले आहेत ते

परंपरेने प्राप्त झालेले आहेत आणि ग्रामपंचायत कायद्यानुसार त्यांना कांही किरकोळ अधिकार देण्यात आले आहेत. पण त्या अधिकारांची अमलबजावणी होत नाही.

**ग्रामपंचायतीचे उत्पन्न :**

सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीचे उत्पन्न म्हणजे शेतसाऱ्याचा हिस्सा मिळणे कांहीं खेड्यात घरपट्टी हि लावली जाते शेणखताचे उत्पन्न, जनावरांच्या दाखल्याचे उत्पन्न, कोंडवड्याचे उत्पन्न ह्याही बाबी उत्पन्नाच्या आहेत.

**ग्रामपंचायतीचा खर्च :**

ग्राम साफसफाई, दिवाबत्ती, शाळा, गटारी इत्यादि बांधकाम नोकर लोकांचा पगार रेडिओ इत्यादि बाबीवर खर्च होतो. ग्रामपंचायतीचे सर्व उत्पन्न खर्च केले जाते पण हा खर्च यथायोग्य तऱ्हेने खर्च होत नाही असे दिसते.

टीप— तपशीला करिता तक्ता पहा.

**ग्रामपंचायतीची निवडणूक :**

ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांची यादी पाहिली तर असे दिसते कीं ते बहुतेक सरंजामीशाहीतील वतनदार पोलिस पाटील माली पाटील, पटवारी, कुलकर्णी, देसाई, देशपांडे, देशमुख इत्यादीच आहेत. गावातील सर्वसामान्य नागरिकाला अजून वाव मिळालेला नाही या दृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे )

**गट ग्रामपंचायत :**

आम्ही कांही गटग्रामपंचायतीची पाहाणी केली. (अ) गट ग्रामपंचायत मलकापूर-१) मलकापूर२) सोमनाथपूर३) शिवटघाळ

(ब) गट ग्रामपंचायत बेळसांगवी - १) बेळसांगवी २) लाळी (खुर्द) ३) येवरी (क) गट ग्रामपंचायत कासराळ १) कासराळ २) मांजरी

गट ग्रामपंचायत मध्ये त्यातील सर्व गावांचा सामान वि-कास होत नाही. ज्या गावचा सरपंच असतो त्याच गांवची झाली तर थोडी फार प्रगति होते. इतर गावांकडे पूर्ण दुर्लक्ष होते. म्हणून प्रत्येक गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत असावी. लोक संख्येचा निकष लावू नये.

**लघु उद्योग :**

खेड्यातील लघु उद्योग धंद्याची प्रगति झालेली दिसत नाही. लघु उद्योग शेतीस जोडधंदा म्हणून सुरु केला पाहिजे म्हण-जेच शेतकऱ्याचे उत्पन्न वाढेल.मजुरांना मजूरी मिळेल. खेड्यातील बेकारी नष्ट होईल.इतरानी कुटीर उद्योग धंदे सुरु केले पाहिजेत.

**आधिकाऱ्यांच्या भेटी :**

अधिकारी वर्ग विशेषतः डेप्यूटी कलेक्टर, तहसीलदार, बी. डी. ओ. इत्यादि सडका असलेल्याच गावांना भेटी देतात. सडके पासून दूर असलेल्या गावाना आधिकारी जात नाहीत असे दिसते. आमदार, खासदार, सत्ताधारी व विरोधी पक्षाचे पुढारी निवडणूकीच्याकाळा व्यतिरिक्त खेडयाना भेटी देत नाहीत. (तपशीलासाठी तक्ता पहा)

तक्ता नंबर ५, ८ पहा

## संकरीत ज्वारी

अन्न धान्याचा प्रश्न आपल्या देशांत सध्या फारच बिकट झालेला आहे. भारतात अन्न धान्याची तूट १९५६ पासून येत आहे. लोक संख्या वाढत आहे. अन्न धान्य समस्या दिवसे दिवस गंभीर होत चालली आहे.ही समस्या सोडविण्याकरिता शास्त्रशुद्ध शेती केली पाहिजे.दर एकरी उत्पन्न वाढवले पाहिजे ज्वारीचे उत्पादन वाढविण्याकरिता संकरीत बी बियाणांचा उपयोग केला पाहिजे. याच वर्षी मोठ्या प्रमाणात हायब्रिड ज्वारी संकरीत ज्वारी) ची मोहीम सुरु करण्यात आली. परंतु या बाबतीत खेड्यापाड्यातून बरेच गैर समज पसरलेले आहे.

**संकरीत ज्वारी संबंधी गैर समज असे :**

१) जुने ते सोने ही भूमिका शेतकऱ्याची आहे. नवीनाचा स्वीकार करण्यास व जुने टाकून देण्यास जे तयार नाहीत नवीन पद्धतीच्या उत्पादनापेक्षा जुन्या परंपरागत पद्धतीचेच उत्पादन अधिक असो त्यांची समजून आहे.

२) ही ज्वारी सकस नाही. या ज्वारीची भाकर चवदार नसते. ही ज्वारी हलकी आहे व भूक लवकर लागते असे त्याना वाटते.

३) संकरीत ज्वारीच्या संरक्षणाकरिता इन्ड्रीन औषध मारले जाते. या औषधामुळे कडबा व हुरडा विषारी होतो व त्यामुळे जनावरे व माणसे मरतात असे त्यांना वाटते.

४) संकरीत ज्वारीचा कडबा नेहमीच्या ज्वारीपेक्षा कमी असतो.

५) कांही लोक या ज्वारीचे आधिकच कौतूक करतात.

६) संकरीत ज्वारी करिता उत्पादन खर्च जास्त असतो असा गैर समज पसरलेला आहे.

७) या ज्वारीचे पीक घेतल्यामुळे जमिन निकस होते असे त्यांना वाटते.

८) नेहमी ज्वारीत मिश्र पीक घेतले जाते. उदा. ज्वारी, तूर, आंबाडी, मुगी, वाळके इत्यादि. परंतु संकरीत ज्वारी बरोबर वरील प्रमाणे मिश्र पीक घेऊ शकत नाही. गैरसमज दूर होण्यासाठी वस्तुनिष्ठ दृष्टिकोणाची अत्यंत आवश्यकता आहे. आम्ही पाहिलेल्या सर्व खेड्यातून सरासरी दर एकरी उत्पन्न १५ क्विंटल आहे असे आढळून आले सर्वात जास्त उत्पन्न मोर्तळवाडीचे पाटील यांनी एकरी ४० क्विंटल उत्पन्न काढले आहे. कमीतकमी उत्पादन आठ क्विंटल आहे. परंतु आठ क्विंटल ज्वारी उत्पादन करण्याकरिता नेहमीच्या ज्वारीच्या पिका पेक्षा अधिक खर्च केलेला नाहीं.

आम्ही पाहिलेल्या खेड्यापैकी सर्वात आधिक संकरीत ज्वारी वाढोणा येथे श्री. भास्करराव गोविंदराव सरदार व व्यंकटराव गोविंदराव सरदार यांच्या शेतात आढळली एकूण १९ एकर क्षेत्रफळावर या ज्वारीचे पीक घेतले. त्यांचे ज्वारीचे सरासरी उत्पादन दर एकरी २० क्विंटल आहे. कांही ठिकाणी संकरीत ज्वारीचे पीक घेतलेले आढळत नाही. कांही ठिकाणी २ ते ३ एकर जमिनच या पिका खाली आहे. तपशीला करिता तक्ता पहा.

## शेती

भारत हा कृषिप्रधान देश आहे. परंतु या देशातील शेती-पद्धति परंपरागत व जुनी आहे. जमीन बहुतेक कोरडवाहूच आहे. पाणि पुरवठयांच्या साधनांचा आभाव आहे. यामुळे शास्त्रशुद्ध पद्धतीने शेती करण्याची आवश्यकता आहे.

**पाणी पुरवठ्याची साधने**

आम्ही पाहिलेल्या खेड्यातील जमीन कोरडवाहूच आढळून आली. प्रत्येक खेड्यात सरासरी २८ एकर जमीन पाण्याखाली आहे. पाणी पुरवठा विहीरीने केला जातो. ऑईल इंजिनहि जेमतेमच आहेत बऱ्हंशी मोठानीच पाणी दिलें जाते. कांही विहीरींना पाणी भरपूर आहे परंतु आर्थिक सामर्थ्य नसल्यामुळे शेतकरी त्याचा उपयोग घेत नाही. त्याच्या शेजाऱ्याला आर्थिक सामर्थ्य असूनहि त्या विहिरीचा उपयोग घेता येत नाही. सध्या पंढरपूर येथे देवणी नदीवर दावण बंधारा बांधण्यात आला आहे. त्याचा उपयोग बऱ्याच शेतकऱ्यांना होणार आहे. प्रत्यक्षात पाणी पुरवठा सुरु झालेला नाही.

वाढोणा बेळसांगवी नजीक तेरु नदीवर चिमेवाडीच्या खालच्या बाजूला धरण बांधण्यासाठी सर्वे घेण्यात आला होता. ही योजना कार्यान्वित करण्याकरिता ४ कोटी रुपये लागतील असे ठरले होते. या योजनेत पाणीपुरवठा खालील गावच्या जमीनीला होईल. १) वाढोणा (खुर्द) २) वाढोणा ( बुजुर्ग ) ३) लाळी ४) येवरी ५) बेळसांगवी ६) कवटगांव ७) ढोरसांगवी ७) सोनवळ ९) मंगरुळ १०) घोणसी ११) उदगीर इत्यादि.

एकूण ४½ लक्ष एकर जमीनीला पाणी दिले जाऊ शकेल. परंतु या योजनेकडे का दुर्लक्ष झाले आहे हे कळत नाही. ही योजना शक्य तो लौकर कार्यान्वित व्हावी असे त्याचे महत्व लक्षात घेता वाटते. तपशीलासाठी तक्ता पहा.

खत :– जमीनीच्या क्षेत्रफळाच्या गरजेनुसार शेणखत अपूरे पडतें. शेणाचा उपयोग जळणासाठी केला जातो. शेतकरी खताचा गांभीर्याने विचार करत नाही. कंपोस्टखत तयार केले जात नाही. रासायनिक खते वापरली जात नाहीत. हिरव्या झाडपाल्यांचे खत करण्याकडेहि त्यांचा कल दिसून येत नाही.

शेतीचे उत्पादन वाढवण्याकरिता चांगल्या प्रकारचे बी बियाणें, आधुनिक शेतीची अवजारे, रासायनिक खते, टोकन पद्धति, जपानी भातशेती इत्यादीं अवलंब करणे आवश्यक आहे.

प्रत्येक तालुक्याला किमान एक शेतकी शाळा उघडण्यात यावी असे आजच्या शेती पद्धतीला पाहून वाटते. शेती व्यवसाय हा अजूनहि अशिक्षित व परंपरागत मूढ दृष्टीकोन असलेल्या वर्गाच्या हातातच आहे. सुशिक्षित व प्रगतिशील दृष्टीकोन असलेल्या वर्गाच्या हातात हा व्यवसाय गेला पाहिजे. शेतकऱ्यांना शेतीप्रशिक्षण देण्याची सोय केली पाहिजे.

जमीनीची मालकी ४० टक्के लोकांच्या हातांत आहे. शेत मजूरांची संख्या ६० टक्के आहे. समाजवादाच्या दृष्टीकोनातून पाहिले असता ही विषमता जाणवण्यासारखी आहे.

---

तक्ता नंबर १, ६, ९ पहा

तक्ता नं. १

| अ. क्र. | खेडेगांवाचे नांव | लोक संख्या | जमीनीचे क्षेत्र फळ (एकरी) | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | नेत्रगांव | ६५० | १२०० | १२०० |
| २ | येणकी | ८५० | १७०० | १७०० |
| ३ | देवणी | ७००० | ९०८८ | ९९४५ |
| ४ | पंढरपूर (कमरोद्दीनपूर) | ७२५ | १६०० | १६०० |
| ५ | गुरधाळ | १०२२ | १७०० | १२०० |
| ६ | शंभुउंबरगा | १५०० | ३८६० | ३८८९ |
| ७ | सताळ | ९३५ | २४०० | २८०० |
| ८ | कबनसांगवी | १२०० | २००० | २००० |
| ९ | डिगरस | १००० | २३०० | २३०० |
| १० | हेर | ३००० | ७००० | ८००० |
| ११ | कुमठा (खुर्द) | १९०० | २००० | २५०० |
| १२ | तोंडार | २९७५ | ५३८३ | ५३८३ |
| १३ | वाढोणा | ५००० | ४५०० | ४२०० |
| १४ | बेळसांगवी | ६०० | ९०० | १२०० |
| १५ | लाळी (खुर्द) | ४२५ | ८०४ | ८७२ |
| १६ | येवरी | ५२५ | ८०० | ८०० |
| १७ | डांगेवाडी | २२५ | ४०० | ४०० |
| १८ | गुडसूर | ३५०० | ४५०० | ५००० |
| १९ | घोनसी | १७८० | ४९०० | २८५६ |
| २० | नळगीर | ४००० | ५५७२ | ५५७२ |
| २१ | कोदळी | १२०० | २५०० | १८०० |
| २२ | कासराळ | ६५० | २००० | ७०० |

तक्ता नं. २

| अ. | खेड्याचे नांव | लोकसंख्या | शाळा | शिक्षक | इमारत |
|---|---|---|---|---|---|
| १ | नेत्रगांव | ६५० | प्राथमिक | १ | ग्रामपंचायत |
| २ | येणकी | ८५० | प्राथमिक | २ | चावडी |
| ३ | देवणी | ७००० | हायस्कूल | १५ | शाळेची स्वत:ची इ० |
| ४ | पंढरपूर (कमरोद्दिनपूर) | ७२५ | प्राथमिक | ३ | चावडी |
| ५ | गुरधाळ | १०२२ | प्राथमिक | १ | देऊळ |
| ६ | शंभुउबरगा | १५०० | माध्यमिक | ६ | शाळेची इमारत |
| ७ | सताळ | ९३५ | प्राथमिक | १ | देऊळ |
| ८ | कबनसांगवी | १२०० | माध्यमिक | ८ | शाळेची अपूर्ण इ० |
| ९ | डिगरस | १००० | प्राथमिक | २ | शाळेची स्वत:ची इ० |
| १० | हेर | ३००० | हायस्कूल (संस्था) | १६ | मठ ( हायस्कूल ) |
| | | | प्राथमिक | | शाळेची स्वत:ची इमारत (प्राथमिक) |
| ११ | कुमठा (खुर्द) | १९०० | माध्यमिक | ६ | |
| १२ | तोंडार | २९७५ | हायस्कूल (संस्था) | १० | माड्याची इमारत |
| | | | प्राथमिक | ९ | शाळेची स्वत:चो इ० |
| १३ | वाढोणा | ५००० | हायस्कूल (मुले) | १० | शाळेची स्वत:ची इ० |
| | | | हायस्कूल (कन्या) | ६ | ,, |
| | | | प्राथमिक | १० | ,, |
| १४ | बेळसांगवी | ६०० | माध्यमिक | ५ | चावडी |
| १५ | लाळी (खुर्द) | ४२५ | प्राथमिक | २ | चावडी |
| १६ | येवरी | ५२५ | प्राथमिक | २ | चावडी |

| अ. | खेडयाचे नांव | लोकसंख्या | शाळा | शिक्षक | इमारत |
|---|---|---|---|---|---|
| १७ | डांगेवाडी | २२५ | प्राथमिक | १ | झोपडी |
| १८ | गुडसूर | ३५०० | हायस्कूल | १० | शाळेची स्वतःची इ० |
| १९ | घोनसी | १७८० | माध्यमिक | ६ | शाळेची स्वतःची इ० |
| २० | नळगीर | ४००० | हायस्कूल | १० | शाळेची स्वतःची इ० |
| २१ | कोदळी | १२०० | माध्यमिक | ४ | चावडी |
| २२ | कासराळ | ६५० | प्राथमिक | १ | शाळेची स्वतःची इ० |

## तक्ता नं. ३

| क्र. | खेडयाचे नांव | पोष्ट ऑफिस | दवाखाना | वाचनालय | पोलीस स्टेशन |
|---|---|---|---|---|---|
| १ | नेत्रगांव | नाही | फक्त जनावराचा | नाही | उदगीर |
| २ | येणकी | नाही | नाही | नाही | देवणी |
| ३ | देवणी | आहे | आहे | आहे | देवणी |
| ४ | पंढरपूर (कमरोद्दीन) | नाही | नाही | नाही | देवणी |
| ५ | गरघाळ | नाही | नाही | नाही | देवणी |
| ६ | शंभु उंबरगा | नाही | नाही | नाही | उदगीर |
| ७ | सताळ | नाही | नाही | नाही | नाका करडखेड |
| ८ | कवनसांगवी | नाही | नाही | नाही | नाका करडखेड |
| ९ | डिगरस | नाही | नाही | नाही | नाका करडखेड |
| १० | हेर | आहे | आहे | नाही | नाका करडखेड |
| ११ | कुमठा (खुर्द) | नाही | नाही | आहे | नाका करडखेड |
| १२ | तोंडार | आहे | आहे | आहे | उदगीर |
| १३ | वाढोणा | आहे | आहे | आहे | वाढोणा |
| १४ | बेळसांगवी | नाही | नाही | नाही | वाढोणा |
| १५ | लाळी (खुर्द) | नाही | नाही | नाही | वाढोणा |
| १६ | येवरी | नाही | नाही | नाही | वाढोणा |
| १७ | डांगेवाडी | नाही | नाही | नाही | वाढोणा |
| १८ | गुडसूर | आहे | फक्त जनावराचा | आहे | वाढोणा |
| १९ | घोनसी | आहे | फक्त महारोग्याचा | आहे | वाढोणा |
| २० | नळगीर | आहे | आहे | आहे | वाढोणा |
| २१ | कोदळी | नाही | नाही | नाही | वाढोणा |
| २२ | कासराळ | नाही | फक्त जनावराचा | नाही | वाढोणा |

## तक्ता नं. ४

| अ. क्र. | खेड्याचे नांव | रेडिओ | टेलिफोन | विद्युत | पोष्ट ऑफिस | सडक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नेत्रगांव | १ | नाही | नाही | नाही | नाही |
| २ | येणकी | १ | नाही | नाही | नाही | नाही |
| ३ | देवणी | ५५ | आहे | नाही | आहे | आहे |
| ४ | पंढरपूर (कमरोद्दीनपूर) | ५ | नाही | नाही | नाही | नाही |
| ५ | गुरधाळ | ३ | नाही | नाही | नाही | नाही |
| ६ | शंभुउबरगा | ६ | नाही | नाही | नाही | नाही |
| ७ | सताळा | २ | नाही | नाही | नाही | नाही |
| ८ | कबनसांगवी | १ | नाही | नाही | नाही | नाही |
| ९ | डिगरस | १ | नाही | नाही | नाही | नाही |
| १० | हेर | ७ | नाही | नाही | आहे | रेल्वेस्टेशन |
| ११ | कुमठा (खुर्द) | ८ | नाही | नाही | नाही | रेल्वे हाल्ट |
| १२ | तोंडार | २० | नाही | नाही | आहे | रेल्वे हाल्ट |
| १३ | वाढोणा | १०० | नाही | नाही | आहे | आहे |
| १४ | बेळसांगवी | १ | नाही | नाही | नाही | नाही |
| १५ | लाळी (खुर्द) | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| १६ | येवरी | २ | नाही | नाही | नाही | नाही |
| १७ | डांगेवाडी | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| १८ | गुडसूर | २० | नाही | नाही | आहे | नाही |
| १९ | घोनसी | ६ | नाही | नाही | आहे | नाही |
| २० | नळगीर | १० | नाही | नाही | आहे | नाही |
| २१ | कोदळी | १ | नाही | नाही | नाही | नाही |
| २२ | कासराळ | ४ | नाही | नाही | नाही | नाही |

| अ. क्र. | खेड्याचे नांव | ग्राम पंचायतीचे वार्षिक उत्पन्न | उत्पन्नाची साधने |
|---|---|---|---|
| १ | नेत्रगांव | ७०० | अनुदान - जनावराचा दाखला-घरपट्टी |
| २ | येणकी | ८०० | ,, |
| ३ | देवणी | १,००,००० | अनुदान-घरपट्टी-दाखला धंद्यावरील कर-शेणखत-कोंडवाडा |
| ४ | पंढरपूर (कमरोद्दीनपूर) | ५०० | अनुदान-दाखला |
| ५ | गुरधाळ | २५०० | अनुदान-घरपट्टी-दाखला |
| ६ | शंभुउंबरगा | २००० | अनुदान-शेणखत-दाखला-घरपट्टी |
| ७ | सताळ | ७०० | अनुदान- दाखला घरपट्टी |
| ८ | कवनसांगवी | १२०० | ,, |
| ९ | डिगरस | १००० | ,, |
| १० | हेर | ३००० | अनुदान-दाखला-घरपट्टी-धंद्यावरील कर |
| ११ | कुमठा (खुर्द) | २५०० | अनुदान-दाखला-घरपट्टी |
| १२ | तोंडार | ९००० | अनुदान-दाखला-घरपट्टी धंद्यावरीलकर-शेणखत-कोंडवाडा |
| १३ | वाढोणा | ८००० | ,, |
| १४ | डांगेवाडी | | |
| १५ | बेळसांगवी | १५०० | अनुदान-दाखला |
| १६ | लाळी (खु.) | | |
| १७ | येवरी | | |
| १८ | गुडसूर | ४००० | अनुदान-दाखला घरपट्टी |
| १९ | घोनसी | ४००० | अनुदान-दाखला-घरपट्टी-शेणखत |
| २० | नळगीर | ८००० | अनुदान-दाखला-घरपट्टी-धंद्यावरीलकर |
| २१ | कोदळी | ६०० | अनुदान-दाखला |
| २२ | कासराळ | ३०० | अनुदान-दाखला |

# तक्ता नं. ६

| अ. क्र. | खेडेगांवाचे नांव | जमीनीचे क्षेत्रफळ | खातेदार |
|---|---|---|---|
| १ | नेत्रगांव | १२०० | ७५ |
| २ | येणकी | १७०० | ११६ |
| ३ | देवणी | ९०८८ | ४१२ |
| ४ | पंढरपूर (कमरोद्दीनपूर) | १६०० | १०० |
| ५ | गुरधाळ | १००० | १०२ |
| ६ | शंभुउंबरगा | ३८६० | १६० |
| ७ | सताळ | २४०० | १२६ |
| ८ | कबनसांगवी | २००० | १२२ |
| ९ | डिगरस | २३०० | ११७ |
| १० | हेर | ७००० | ४०० |
| ११ | कुमठा (खुर्द) | २००० | २५० |
| १२ | तोंडार | ९३८३ | ३८५ |
| १३ | वाढोणा | ४५०० | ३५० |
| १४ | वेळसांगवी | ९०० | ५० |
| १५ | लाळी (खुर्द) | ८०४ | ४० |
| १६ | येवरी | ८०० | ५० |
| १७ | डांगेवाडी | ४०० | २४ |
| १८ | गुडसूर | ४५०० | २३५ |
| १९ | घोनसी | ४९०० | २४० |
| २० | नळगीर | ५५७२ | ३१० |
| २१ | घोदळी | २५०० | ८० |
| २२ | कासराळ | २००० | ६० |

## तक्ता नं. ७

| अ. क्र. | खेडेगांवाचे नाव व लोकसंख्या | जात: मराठा | लिंगायत | हरिजन | मुसलमान | इतर | भाषा: मराठी | कन्नड | उर्दू |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नेत्रगांव<br>६५० | २३८ | २३८ | ८० | ८० | १४ | मराठी | कन्नड | उर्दू |
| २ | येणकी<br>८५० | ३00 | २00 | १00 | १00 | १५0 | ,, | ,, | ,, |
| ३ | देवणी<br>७००० | ५०० | ४००० | ७०० | १५०० | ३०० | मराठी | कन्नड | उर्दू |
| ४ | पंढरपूर<br>७२५ | ५० | २०० | २०० | १०० | १७५ | ,, | ,, | ,, |
| ५ | गुरधाळ<br>१०२२ | ३०० | रेड्डी.३०० | १५० | ५० | २२२ | ,, | — | — |
| ६ | शंभुउंबरगा<br>१५०० | १५ | ४०० | ४०० | २० | रेड्डी.४६५<br>इ. २०० | ,, | — | उर्दू |
| ७ | सताळा<br>९३५ | आ.७५ | ३०० | २५० | १०० | रेड्डी.७५<br>इ. १३५ | ,, | — | — |
| ८ | कबनसांगवी<br>१२०० | २०० | ४०० | ४०० | २५ | १७५ | ,, | कन्नड | — |
| ९ | हिगरस<br>१००० | ३५० | २५ | ३५० | ५० | कोळी.२००<br>इ. २५ | ,, | — | — |
| १० | हेर<br>३००० | १००० | ३०० | १००० | १५० | रेड्डी. ३००<br>इ. २५० | ,, | कन्नड | — |
| ११ | कुमठा(खु.) | ४०० | ४०० | १००० | ५० | ५० | | ,, | ,, |
| १२ | तोंडार<br>२६५२ | — | १५०० | ९०० | २०० | ५२ | ,, | ,, | — |
| १३ | वाढोणा<br>५००० | १७०० | ४०० | १७०० | १००० | २०० | ,, | कन्नड | उर्दू |

| | खेडेगांवाचे नाव व लोकसंख्या | जात | | | | | भाषा | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मराठा | लिंगायत | हरिजन | मुसलमान | इतर | मराठी | कन्नड | उर्दू |
| | वेळसांगवी ६०० | ३५० | २५ | १५० | ५ | ७० | ,, | — | — |
| | लाळी (खु.) ४२५ | ५० | २५० | ७५ | — | ५० | ,, | — | — |
| १६ | येवरी ५२५ | ३५० | — | १०० | ५ | ७० | ,, | — | — |
| १७ | डांगेवाडी २२५ | ११० | — | ५ | ११० | — | ,, | — | उर्दू |
| [१८] | गुडसूर ३५०० | ५०० | २०० | १००० | ५०० | रेड्डी. १००० इ. ३०० | ,, | — | ,, |
| | घोनसी १८०० | १००० | २५ | ५०० | २५ | २५० | ,, | — | — |
| [२] | नळगीर ४००० | २०० | ८०० | ९०० | ८०० | रेड्डी. ८०० इ. ६०० | ,, | — | उर्दू |
| २१ | कोदळी १२०० | ३०० | २५० | ५०० | — | १५० | ,, | — | — |
| [२] | कासराळ ६५० | ५० | — | ३०० | ५ | रेड्डी. १५० इ. १४५ | ,, | — | — |

## तक्ता नं. ८

| अ. क्र. | खेड्याचे नांव | * आधिकारी | भेटी |
|---|---|---|---|
| १ | नेत्रगांव | | नाही |
| २ | येणकी | | नाही |
| ३ | देवणी | | दिल्या |
| ४ | पंढरपूर (कमरोद्दीन) | बी. डी. ओ. | दिली |
| ५ | गुरधाळ | | नाही |
| ६ | शंभुउंबरगा | बी. डी. ओ. | दिली |
| ७ | सताळ | | नाही |
| ८ | कवनसांगवी | | नाही |
| ९ | डिगरस | | नाही |
| १० | हेर | तहसीलदार बी. डी. ओ. | दिल्या |
| ११ | कुमठा (खुर्द) | | नाही |
| १२ | तोंडार | | दिल्या |
| १३ | वाढोणा | | नाही |
| १४ | वेळसांगवी | | नाही |
| १५ | लाळी (खुर्द) | | नाही |
| १६ | येवरी | | नाही |
| १७ | डांगेवाडी | | नाही |
| १८ | गुडसूर | बी. डी. ओ. | दिली |
| १९ | घोनसी | | नाही |
| २० | नळगीर | | नाही |
| २१ | कोदळी | | नाही |
| २२ | कासराळ | तहसीलदार | दिली |

* डेप्यूटि कलेक्टर, तहसीलदार,बी.डी.ओ.इत्यादि आधिकारी गृहीत आहेत

तक्ता नं. ९

| अ. क्र. | खेडेगांवाचे नांव | विहीर | ऑईल इंजिन | पाण्याखालील जमीन एकर | एकंदर क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | नेत्रगांव | ४ | ३ | १६ | १२०० |
| २ | येणकी | २ | २ | ८ | १७०० |
| ३ | देवणी | १२ | ८ | १० | ९०८८ |
| ४ | पंढरपूर (कमरोद्दीनपूर) | – | – | नाही | १६०० |
| ५ | गुरधाळ | १० | १२ | १२० | १७०० |
| ६ | शंभुउंबरगा | १० | १० | ८ | ३८६० |
| ७ | सताळ | ८ | १० | १६ | २४०० |
| ८ | कवनसांगवी | ४ | ३ | २० | २००० |
| ९ | डिगरस | १२ | १६ | २५ | २३०० |
| १० | हेर | ७ | ६ | ५० | ७००० |
| ११ | कुमठा | ४ | ३ | ८ | २००० |
| १२ | तोंडार | १० | १६ | २८ | ५३८३ |
| १३ | वाढोणा | ६१ | २७ | १८३ | ४५०० |
| १४ | बेळसांगवी | ८ | ६ | ३२ | ९०० |
| १५ | लाळी (खुर्द) | ५ | २ | १५ | ८०४ |
| १६ | येवरी | ५ | ३ | १६ | ८०० |
| १७ | डांगेवाडी | २ | २ | ५ | ४०० |
| १८ | गुडसूर | १८ | १० | २५ | ४५०० |
| १९ | घोनसी | ६ | ६ | ८ | ४९०० |
| २० | नळगीर | १० | ५ | २० | ५५७२ |
| २१ | मोदळी | — | — | नाही | २५०० |
| २२ | कासराळ | २ | २ | ३ | २००० |

| अ.क्र. | खेडेगांवाचे नांव | संकरीत ज्वारी खालील जमीन (क्षेत्रफळ एकर मध्ये) |
|---|---|---|
| १ | नेत्रगांव | नाही |
| २ | येणकी | ३ |
| ३ | देवणी | ७५ |
| ४ | पंढरपूर (कमरोद्दीनपूर) | २० |
| ५ | गुरधाळ | २ |
| ६ | शंभुउंबरगा | २० |
| ७ | सताळ | नाही |
| ८ | कवनसांगवी | १० |
| ९ | डिगरस | ४१ |
| १० | हेर | १३ |
| ११ | कुमठा | १० |
| १२ | तोंडार | २२ |
| १३ | वाळोणा | ५२ |
| १४ | बेळसांगवी | २० |
| १५ | लाळी | २ |
| १६ | येवरी | नाही |
| १७ | डांगेवाडी | १ |
| १८ | गुडसूर | १२ |
| १९ | मोनसी | ६ |
| २० | नळगीर | १०२ |
| २१ | कोदळी | ६ |
| २२ | कासराळ | ७ |